चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०६ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०५/०४/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, भद्रावती, चिमुर, पाथरी, सावली, कोरपना, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **११** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०९** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **१,००,४००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

————————————————————————————————————————————

# चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन गडचांदुर :—**

दिनांक **०५/०४/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **गडचांदुर** अंतर्गत नांदाफाटा येथे ०१ आरोपी ईसम हा सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गडचांदुर** येथे अप. क्र. **११५/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **५२०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **गडचांदुर** पोलीस करीत आहे.

————————————————————————————————————————————

# मोहा दारूतयार करणाऱ्या आरोपीस ०३ वर्ष कारावास व २५ हजार रू दंडाची शिक्षा

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत मौजा कवडसी जंगल परिसरात मोहा दारूची तयार करून विक्री करणाऱ्या आरोपीस ०५/०४/२०१९ रोजी **श्री. छल्लानी, न्यायदंडाधिकारी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

दिनांक १२/१२/२०१५ रोजी चिमुर येथील पोलीस पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीवरून मौजा कवडसी जंगल परिसरात अवैध मोहा हातभट्टीवर धाड टाकली असता **आरोपी नामे सुधाकर फकीरा नान्हे वय ३० रा. चिमुर** याचे ताब्यात अवैध रित्या मोहा दारू आणि त्यास तयार करण्यासाठी लागणारे साहीत्य असा एकुण २१,७७५/—रू चा मुद्देमाल मिळुन आला. अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चिमुर येथे कलम ६५ ई मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोनि. संतोष पाले पोस्टे चिमुर यांनी पुर्ण करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०५/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे सुधाकर फकीरा नान्हे वय ३० रा. चिमुर यास सीआरपीसी कलम २५५(२) अन्वये कलम ६५ ई मुंबई दारूबंदी कायदा अन्वये ०३ वर्ष कारावासाची आणि २५,०००/—रू दंड, न भरल्यास ०६ महिने शिक्षा श्री. छलानी, न्यायदंडाधिकारी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संजय आर. ठावरी, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन **सफौ. सुधाकर बुटके पोस्टे. चिमुर,** यांनी काम पाहिले.

———————————————————————————————